| MHNS240022152025 | नियमित दिवाणी दावा क्र.५०६/२०२५ मधील नि.क्र.३९ वरील आदेश |
|---|---|
| | मंजी हिरामण अहिरे व इतर<br>वि.<br>मिनाबाई हिरामण अहिरे व इतर |

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांची कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादी यांचे कथन की, प्रतिवादी यांना प्रस्तुत दाव्याच्या अनुषंगाने आवश्यक असणा–या कागदपत्रांची जमवाजमव करण्यास फारच कालावधी लागल्यामुळे प्रस्तुत दाव्यास कैफियत देण्यास विलंब झालेला आहे. सदर विलंब हा प्रतिवादी क्र. २ यांच्या निष्काळजीपणामुळे झालेला नाही. सबब, प्रतिवादी क्र.२ यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. वादी यांनी प्रस्तुत अर्जास हरकत नोंदवून प्रतिवादी क्र.२ यांचेवर खर्च रक्कम रुपये २,०००/– चा आदेश होण्याबाबत विनंती केली आहे.

**०३.** उभय पक्षकारांच्या विधीज्ञांचा तपशिलवार युक्तिवाद ऐकला.

**०४.** अभिलेखाची पाहणी केली असता वादी यांनी सदरचा दावा जाहिरनामा व निरंतर ताकीदीकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२ यांना समन्सची बजावणी झाल्यानंतर ते वकिलांमार्फत न्यायालयात हजर झाले. परंतु, वारंवार संधी देवुनही त्यांनी त्यांचे म्हणणे/जबाब विहित कालावधीत दाखल केले नाही. त्यामुळे नियमानुसार प्रस्तुत दावा त्यांच्याविरुध्द विनाकैफियत/विना म्हणणे चालवण्यात आला. प्रस्तुत अर्जान्वये प्रतिवादी क्र.२ हे सदर दाव्यास त्यांची कैफियत दाखल करुन विरोध करत आहेत. त्यामुळे दोन्ही पक्षकारांचे हक्कसंबंध गुणदोषारोवर सिध्द करण्याकामी परवानगी देणे नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने आवश्यक आहे. असे असले तरी, प्रतिवादी क्र.२ यांना कैफियत दाखल करण्यास विलंब झाला आहे. सदर विलंब काही रक्कम खर्च म्हणुन त्यांच्याकडुन वादी यांना दिल्यास प्रकरणाचा उद्देश

सफल होईल व सदर प्रकरण हे गुणदोषारोवर न्यायनिर्णीत होण्यास मदत होणार आहे. सदर अर्ज मंजुर केल्यावर उभय पक्षकारांमध्ये विविध प्रकरणे दाखल होणार नाहीत व गुंतागुंत वाढणार नाही. सबब, निम्न आदेश.

**आ दे श**

प्रतिवादी क्र.२ यांचा नि.क्र.३९ वरील अर्ज त्यांनी वादी यांना रक्कम रु.५००/– खर्च पुढील तारखेपर्यंत देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

MADHUSUDAN DINKAR MAHADIK

Digitally signed by MADHUSUDAN DINKAR MAHADIK
Date: 2026.04.04 17:06:24 +0530

**दिनांक : ०४/०४/२०२६** **(मधुसूदन दिनकर महाडीक)**

**ठिकाण : सटाणा** **२ रे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर, सटाणा.**